# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

## विद्यापीठात आज अमोल उदगीरकर यांचे व्याख्यान

जळगाव दि.१० (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शनिवार, दि.११ जानेवारी रोजी कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमाले अंतर्गत पटकथाकार व सिनेसमीक्षक अमोल उदगीरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्रमांक तीन मध्ये सायंकाळी ६ वाजता हे व्याख्यान होणार असून श्री.उदगीरकर हे “सिनेमा कसा पाहावा” या विषयावर बोलणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जितेंद्र नाईक राहणार आहेत. कर्मवीर व्यंकट रणधीर प्रतिष्ठान, शिरपूर यांनी दिलेल्या देणगीतून ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

---

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमीस प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यापीठात आजपासून त्रिवेणी व्यवसाय शिखर परिषद

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ई-मेल/२०२०                    दिनांक:- १० जानेवारी,२०२०

जळगांव दि.१० (        ):- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आज शनिवार पासून दोन दिवसीय त्रिवेणी व्यवसाय शिखर परिषदेला प्रारंभ होत आहे.

विद्यापीठ आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, जळगाव शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचे औपचारिक उदघाटन सायंकाळी ४ वाजता होणार आहे. तत्पुर्वी सकाळी ९.४५ वाजता चर्चा सत्राला प्रारंभ होणार असून विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात व्यावसायिकांसाठी जी.एस.टी. पॉलीसी आणि सुधारण व आव्हाणे या विषयावर सीए दर्शन जैन, डी.आर.गुप्ता, अविनाश घुंडीयाल हे बोलणार आहेत. त्यानंतरच्या सत्रात बँकांचे व्याज धोरण पुनर्रचना आणि नवीन कर्ज या विषयावर सीए अनिल राव, विना राव, श्रीराम देशपांडे, श्री.सुशीलकुमार, अशोक दुगाडे बोलतील त्यानंतर व्यावसायिकांची बैठक होईल. याच दिवसी सकाळी अधिसभा सभागृहात निर्माण लिमिटेडचे अजित मराठे, एल अँण्ड टी चे माजी उपाध्यक्ष अशोक शहाणी, प्रदिप पेशकार, हेमंत ठोंबरे हे विद्यार्थ्यांना उद्योजकीय क्षेत्रातील करियर, कौशल्य, स्टार्टअप या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी २ वाजेनंतर विद्यार्थी आपल्या प्रकल्पांचे सादरिकरण करणार आहेत.  सायंकाळी ४ वाजता नवी दिल्लीच्या नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ.एच.पुरुषोत्तम यांच्या हस्ते उदघाटन होईल. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी राहतील.

रविवार, दि.१२ जानेवारी रोजी व्यावसायिक, उद्योजक व विद्यार्थ्यांसाठी सकाळी होणाऱ्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी उत्पादनात सध्याची आव्हाणे आणि बदलणारी तंत्रज्ञान या विषयावर अतुल तरे, उदयन पाठक, प्रफुल्ल खाचणे, नरेंद्र वाघ, संजय प्रभुदेसाई, हमिद मेमोन,सचिन जोशी हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर अविनाश साठे, समीर हेगीस्ते, तसनिम वासोवाला, नितीन मकासरे हे मार्गदर्शन करतील. त्यानंतर निर्यात संधी या विषयावर डॉ. रजत श्रीवास्तव, वरुण चुलाटे, चंद्रकांत चौधरी मार्गदर्शन करतील. उर्जा साठवणूक या विषयावर संदीप गुप्ते, संजिव फडवणीस, देवदत्त गोखले, किशोर ढाके मार्गदर्शन करतील. याच दिवसी अधिसभा सभागृहात नवीन माध्यमांविषयी संदीप कुलकर्णी, अनिल जोशी, देवेंद्र बाळसराफ, बोलणार आहेत. कलस्टर बिझिनेस या विषयावर उमेशचंद्र दंडगव्हाळे, बंकीम मिस्त्री, छबीराज राणे मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतरच्या सत्रात कृषी आणि तंत्रज्ञान वेअर हाऊसिंग आणि अन्न प्रक्रिया या विषयावर अल्केश अग्रवाल, हेमंत विद्या,सुनील मारवाह, सत्येंद्र सिंग

आर्य, अशोक शहाणे, बोलणार आहेत. दुपारच्या सत्रात कपील पाठक, विनायक पाठक हे आतिथ्य सेवा यावर बोलतील. त्यानंतर भू संपत्ती व पायाभूत प्रकल्प या मधील संधी आणि आव्हाने या विषयावर भरत अमळकर,नरेश कारडा, धनंजय जकातदार, अश्विन अग्रवाल हे बोलतील.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमीस प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी